### अवैध गौण खनिज वाहतूक करणारी दोन वाहने केली जप्त

**महागाव** : अवैधरीत्या गौण खनिजाची वाहतूक करणारी दोन वाहने जप्त करून तहसील कार्यालयात लावली आहेत. रविवारी सकाळी ८ वाजता शिरफुली येथे अवैध रेती वाहतूक करणारे वाहन पकडण्यात आले. ही कारवाई उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे व तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी राम पंडित, ग्राम महसूल अधिकारी एम. एम. शेख, विनोद ढोणे, देवानंद फोफसे, सदानंद जराड, विजय पोटे, आकाश कनाके, सुरज लोणकर, दीपक वैरागडे, केशव मोहिते तसेच पोलिस कर्मचारी गजानन एडतकर यांनी केली. पकडलेले वाहन नावेद खान याचे असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, पेढी परिसरात अवैध मुरूम तस्करी करणारे ट्रॅक्टर ग्राम महसूल अधिकारी एस. के. जाधव व नीलेश अखाडकर यांनी पकडले. संबंधित ट्रॅक्टरदेखील महागाव तहसील कार्यालयात जमा करण्यात आला आहे.

# नर्सिंग कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपामुळे आरोग्य सेवा विस्कळीत



**यवतमाळ, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या नेतृत्वाखाली यवतमाळ मेडिकल कॉलेजसह राज्यभरातील नर्सिंग कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी आंदोलन छेडले आहे. या आंदोलनाचा आरोग्य सेवांवर मोठा परिणाम दिसून येत आहे.

सुरुवातीला १५ आणि १६ जुलै रोजी विविध मागण्यांसाठी नर्सिंग कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले. त्यानंतर १७ जुलै रोजी एक दिवसाचा लाक्षणिक संप पाळण्यात आला.

मात्र सरकारकडून याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे १८ जुलैपासून बेमुदत संप सुरू करण्यात आला आहे. आज या बेमुदत संपाचा पाचवा दिवस आहे. संपाच्या परिणामामुळे मेडिकल कॉलेजमधील आरोग्य सेवा ठप्प झाली आहे. स्टाफ कमी असल्याने अनेक रुग्णांना उपचारासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. यामध्ये शस्त्रक्रिया स्थगित होणे, ऑपरेशन रद्द होणे यासारख्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. काही ठिकाणी रुग्णांना दुसऱ्या रुग्णालयात हलवावे लागत आहे.

मागण्या मान्य होत पर्यंत आंदोलन संपणार नाही असा इशारा महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा यवतमाळच्या जिल्हाध्यक्ष श्रीमती संगीता राठोड, जिल्हा सचिव श्री सिद्धार्थ मेश्राम, कार्याध्यक्ष अतुल राऊत, उपाध्यक्ष आरती मडावी विश्वास चांदेकर, संघटक श्रीमती सुरेखा मदनकर, सहसचिव श्रीमती वैशाली दातार, खजिनदार श्रीमती सुजाता नांदगावकर, सह खजिनदार श्रीमती कविता गेडाम तसेच सदस्य नीलिमा भोयर, निशा दुबे, मोनिका भादीकर, वैशाली वाघ, दिपाली जटाळे, सुखदेव राठोड, उमेश चिमूरकर, आकाश राठोड, निखिल तारेकर, घनश्याम कोल्हे तसेच प्रसिद्ध प्रमुख सुरेश मदनकर यांनी दिला आहे.

अधिपरिचारिका, परिसेविका व पाठयनिर्देशिका या पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन त्रुटी निवारण करावे, राज्यातील परिचारिकांना केंद्रशासनाप्रमाणे नर्सिंग भत्ता ७२००/, गणवेश भत्ता १८००/, मंजूर करावा व पात्र परिचारिकांना शैक्षणिक भत्ते मंजूर करावे, केंद्रशासनाप्रमाणे राज्यातील परिचारिकांच्या पदनामामध्ये बदल करण्यात यावा, दि. ०६/०६/२५ रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या कंत्राटीभरती परिपत्रकातून परिचारिकांना वगळण्यात यावे परिचर्या संवर्गातील शुश्रुषा, शैक्षणिक व अशैक्षणिक विविध पदाच्या कायमस्वरूपी १००% पदभरती, पदनिर्मिती व पदोन्नती करण्यात याव्यात. वाढलेल्या अतिरिक्त खाटा नविन महाविद्यालये व वाढत्या विद्यार्थी संख्येनुसार नविन आकृतीबंध मंजूर करावा. परिचारिकांचे अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित/दुर्लक्षित असल्याने, परिचारिकां संवर्गाच्या स्वतंत्र संचालनालयाची स्थापना करावी, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या धर्तीवर परिचारिका संवर्गासाठी शुश्रुषा संचालक/ सहसंचालक पदाची पदनिर्मिती करण्यात यावी, अधिपरिचारिका सेवाप्रवेश नियमातील लिंगभेद निर्माण करणारे स्त्री-पुरुष प्रमाण ८०:२० वगळावे, परिचारिकांच्या आस्थापना विषयक कामकाजातील दफ्तर दिरंगाई दूर करावी, GNM विद्यार्थी परिचारिकांचे विद्यावेतन मागील ७० वर्षापासून वाढले नाही. वाढती महागाई व BSC नर्सिंगच्या विद्यार्थ्याप्रमाणे GNM च्या विद्यार्थ्यांना ही विद्यावेतन देण्यात यावे यासह विविध मागण्या प्रलंबित असल्यामुळे परिचारिकांनी आंदोलन सुरू केले आहे.

# कोपरा दोन पुनर्वसित गावाला ग्रामपंचायत चा दर्जा द्या



**यवतमाळ, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: राळेगाव विधानसभा मतदारसंघातील मौजा कोपरा दोन तालुका बाबुळगाव या गावाचे बेंबळा प्रकल्पामुळे पुनर्वसन झाले परंतु सदरील गावाला ग्रामपंचायत दर्जा मिळाला नसल्याने गावातील नागरिकांना अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे

यामध्ये जन्म मृत्यूचा दाखला, शेती संदर्भातील सातबाराचे उतारे, फेरफार, याशिवाय ग्रामपंचायतची संबंधित सर्व कामे होत नाही या गावांचा कारभार दुसऱ्या ग्रामपंचायतीकडे वर्ग केला असल्याने वेळेवर ग्रामपंचायत कर्मचारी उपलब्ध होत नाही त्यामुळे कोपरा दोन बाभुळगाव पुनर्वसित गावाला ग्रामपंचायत चा दर्जा तात्काळ द्यावा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडून प्रस्ताव बोलवून घ्यावा अशी मागणी गावकऱ्यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे त्याबाबतचे निवेदन देखील त्यांना मंत्रालयात देण्यात आले.

बेंबळा प्रकल्पग्रस्त यांचे पुनर्वसन १७ वर्षापासून होऊन सुद्धा ग्रामपंचायत उपलब्ध नाही या गावाची लोकसंख्या ग्रामपंचायत निर्माण करणे इतपत झालेली आहे त्यामुळे गावाला महसुली दर्जा देणे क्रमप्राप्त आहे असेही नामदार जयकुमारजी गोरे यांना सांगण्यात आले आहे, त्यांनी देखील ग्रामपंचायत करण्यासंदर्भात संबंधित विभाग जिल्हा परिषद जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात येईल आणि सर्व कागदपत्राची पूर्तता झाल्यानंतर हे काम केल्या जाईल असे अभिवचन दिले.

याबाबतचे निवेदन नामदार अशोकजी उईके यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले यावेळी भाजपाचे सोमेश चौधरी, रमेश भोयर, बाबाराव काळपांडे, रवींद्र कोटेजा,मनोज वानखेडे पंकज रूनवाल, सर्व बेंबळा प्रकल्पग्रस्त समिती समन्वयक उपस्थित होते.

# जुगारात पैसे हारलेल्या युवकाची चाकूच्या धाकावर दहशत

**पांढरकवडा,दि.२१, महासागर प्रतिनिधी**: शहरातील आठवडी बाजारातील जुगार अड्ड्यावर पैसे हारलेल्या युवकाने तेथील जुगाऱ्या सोबत वाद घातला हा वाद विकोपाला गेला.आणी त्या युवकाने जुगा-यांना मारण्याकरीता चाकु आणुन आठवडी बाजारात धुडगूस घातला होता.अवैध धंद्यासाठी कृप्रसिध्द असलेल्या शहरातील आठवडी बाजारातील एका जुगार अड्ड्यावर १९ जुलै रोजी रात्री दरम्यान इंदिरा नगर मध्ये राहणारा श्रीकांत शाम प्रधान वय २३ हा पैसे हारला होता. त्याने हरलेले पैसे जुगार अड्डा चालकास परत मागितले. त्याला पैसे देण्यास जुगार अड्डा चालकाने नकार दिल्याने त्याने तेथे धिंगाणा घातला. काहींनी तेव्हा मध्यस्थी करून तो वाद मिटविला होता. मात्र काही वेळाने तो युवक मद्यप्राशन करून हातात धारदार चाकु घेऊन पुन्हा त्या जुगार अड्ड्यावर येवून वाद घालु लागला. त्याने बाजारात जोरजोराने आवाज करून चाकु दाखवित दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

यावेळी काहींनी त्याला पकडून पोलीस स्टेशन मध्ये आणले. पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा नोंद केला आहे.

## २२४ हेक्टर शेती पिकांना फटका



**दारव्हा** : तालुक्यातील ब्रह्मनाथ येथे १६ जुलै रोजी सायंकाळी ढगफुटीसदृश्य पाऊस पडला. यामुळे २१० शेतकऱ्यांच्या २२४ हेक्टरवरील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ब्रह्मनाथसह आजूबाजूच्या गावांत सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास पावसाला सुरुवात झाली. प्रचंड पावसामुळे गावातील रस्त्यांना नदी-नाल्याचे स्वरूप आले होते. पावसाचा कोवळ्या अवस्थेत असलेल्या पिकांना फटका बसला. अनेक शेतांत पाणी साचलेले असल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत. त्याचबरोबर पिकांना देण्यासाठी घरात ठेवलेल्या रासायनिक खतांचे सुद्धा नुकसान झाले आहे. अंतरगाव येथे रेल्वे पुलाचे काम सुरू असल्याने नदीचे पाणी शेतात घुसल्याने जवळपास दहा शेतकऱ्यांचे नुकसान झाले. या झालेल्या नुकसानाचे सर्वेक्षण करून ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी तहसील कार्यालयाकडे अहवाल सादर केला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तातडीने भरपाई देण्याची मागणी केली आहे. दरवर्षी अतिवृष्टी व अवकाळी पावसाचा फटका पिकांना बसून नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत.

# विशेष मध्यस्थी मोहिमेंतर्गत विभक्त होण्याच्या मार्गावरीलजोडप्यांची पुन्हा जुळली रेशीमगाठ



**यवतमाळ, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: जिल्ह्यात विशेष मध्यस्थी मोहिम दि.१ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत राबविण्यात येत आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयामार्फत मध्यस्थी कक्ष सस्थापन करण्यात आले असून कक्षाचे उद्घाटन करण्यात आले आहे. या कक्षात प्रशिक्षित मध्यस्थ अधिवक्त्यांकडून दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकल्या जातात. सदर प्रशिक्षित मध्यस्थी अधिवक्त्याकडून याबाबतचा फायदा व तोटा काय आहे हे दोघांनाही समजावून सांगितल्या जातात. कक्षाच्या मदतीने विभक्त होण्याच्या मार्गावर असलेल्या जोडप्यांची पुन्हा रेशीमगाठ जुळविण्यात आली आहे.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, यवतमाळ यांच्याकडील प्रकरणातील एक जोडपे विभक्त होण्याच्या उंबरठ्यावर असतांना त्यांच्यामध्ये प्रशिक्षित मध्यस्थांनी मध्यस्थीद्वारे चर्चा करुन त्यांच्यात समझोता घडवून आणला. या जोडप्याने भविष्याचा विचार करुन पुन्हा सुखाने नांदण्याचा निर्णय घेवून त्यांच्या रेशीमगाठी पुन्हा जुळल्याने त्यांचा परिवार व मुले आनंदी झाले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्याकडून सदर जोडप्याला भेटवस्तु देवून त्यांना पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नागेश न्हावकर यांच्याहस्ते सदर जोडप्याला रोपटे देवून पुढील भविष्याकरीता शुभेच्छा देण्यात आल्या. जोडप्यामध्ये मध्यस्थी घडवून आणल्याबद्दल चेतन गांधी यांना रोपटे देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव दिपक दाभाडे उपस्थित होते.

## नेर येथे ग्राहक पंचायतची बैठक

**नेर** : येथील विश्रामगृहात अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या बैठकीत कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. कार्यक्रमाला विदर्भ प्रांताध्यक्ष नारायण मेहरे, जिल्हाध्यक्ष अनंत भिसे, जिल्हा सहसचिव जिनेन्द्र बंगाले, संजय जोशी उपस्थित होते. बैठकीत नेर शाखेच्या तालुकाध्यक्षपदी प्रा. सुरेश ढोके, उपाध्यक्ष डॉ. मोहन शर्मा, प्रा. मनोहर देशमुख, सचिव संजय भोयर, सहसचिव प्रा. सईद खान, कोषाध्यक्ष के. पी. देशमुख, महिला प्रमुख सोनाली देशमुख, मार्गदर्शन केंद्र प्रमुख किशोर खोब्रागडे, प्रसिद्धी प्रमुख उमेश इंगोले, विधी प्रमुख अनिल शर्मा, पर्यावरण प्रमुख गणेश राऊत, रोजगार प्रमुख वसंतराव काटगळे, आयटी सेल प्रमुख प्रवीण पाटमासे यांची नियुक्ती करण्यात आली. सदस्यांमध्ये इंतियाज, प्रा. राजेश गुल्हाने, प्रा. मिलन तायडे, किसनराव घरडे, मिलिंद जगताप, रवींद्र कदम आदींचा समावेश आहे.

## माळेगाव परिसरात अस्वलाचा वावर; ग्रामस्थांमध्ये भीती

**यवतमाळ** : माळेगाव गावालगत मागील दोन दिवसांपासून वन्यप्राणी अस्वलाचा सतत वावर सुरू असून, यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सावळी सदोबा ते माळेगाव या मुख्य रस्त्यावरच अस्वल थांबत असल्यामुळे नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. माळेगाव गाव चारही बाजूंनी घनदाट जंगलांनी वेढलेले असल्यामुळे येथे वारंवार वन्यप्राण्यांचा वावर दिसून येतो. उन्हाळ्यात जंगलातील पाण्याची टंचाई निर्माण होताच अनेक वन्यप्राणी मानवी वस्तीकडे येतात आणि त्यामुळे मानव प्राणी संघर्ष वाढतो. या अगोदरसुद्धा वन्यप्राणी अस्वलाच्या हल्ल्याच्या मोठ्या घटना घडल्या आहेत. वारंवार घडणाऱ्या या घटनांनंतरही वनविभाग याकडे सतत दुर्लक्ष करत असल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहे. आजही दुपारी वन्यप्राणी अस्वल रस्त्यावर येऊन बसल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. ग्रामस्थांनी आरडाओरड करून अस्वलाला हुसकावून लावले. वनविभाग कोणतीही सुरक्षा व्यवस्था करीत नसल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दररोज रस्त्यावर अस्वल दिसत असल्याने लहान मुलांना शाळेत पाठवतानाही पालकांना भीती वाटत आहे. वनविभागाने अस्वलाला जेरबंद करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

## आदिवासी मुलींकरीता वसतीगृह दिग्रस येथे प्रवेश

**दिग्रस**: तालुक्यातील आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह दिग्रस येथे या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया सुरु झाली आहे. ईच्छूक विद्यार्थीनींनी प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वसतीगृहाची प्रवेश क्षमता १२५ विद्यार्थीनी असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता विद्यार्थीनी अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक आहे. वर्ग ८ वा, वर्ग ११ वी व वरिष्ठ महाविद्यालय, विद्यार्थीनींची वसतीगृहात नि:शुल्क उत्तम राहण्याची व भोजनाची व्यवस्था, निर्वाह भत्ता व ईतर सुविधा पुरविण्यात येते. शासनाने ठरवुन दिलेल्या निकषाप्रमाणे डीबीटीद्वारे रक्कम विद्यार्थीनींच्या खात्यात जमा करण्यात येतील, प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करावे, असे आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृहाचे गृहपाल यांनी कळविले आहे.

## श्रावण मासानिमित्त विविध कार्यक्रम

**वणी** : येथील रंगनाथस्वामी देवस्थानात २६ जुलै ते १८ ऑगस्टदरम्यान श्रावण मासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. २६ ते २८ जुलैच्या दरम्यान दुपारी ३ वाजता हभप बबन महाराज कोंडोलीकर यांचे प्रवचन, १ ऑगस्टला दुर्गा सप्तशक्ती पाठ, २ ला महासंत श्री जगन्नाथ उपासना, ४ ला संगीतमय सुंदरकांड, ७ ला महासंत श्री गजानन महाराज उपासना, ११ ला दुपारी हभप मनुमहाराज तुगनायत यांचे विष्णू सहस्त्र नामावली पठण, भक्तिसंगीताचा कार्यक्रम, १५ ला श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव, १६ ला सकाळी श्रीकृष्णांची पालखी व शोभायात्रा, दुपारी ५ रामधुनचा कार्यक्रम आयोजित आहे.

## आदिवासी मुलांचे वसतीगृहात येथे प्रवेश

**दिग्रस**: तालुक्यातील आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह दिग्रस येथे या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया सुरु झाली आहे. ईच्छूक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वसतीगृहाची क्षमता ७५ विद्यार्थी असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता विद्यार्थी अनुसूचीत जमातीचा असणे आवश्यक आहे. वर्ग ८ वा, वर्ग ११ वी व वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांना वसतीगृहात नि:शुल्क उत्तम राहण्याची व भोजनाची व्यवस्था, निर्वाह भत्ता व ईतर सुविधा पुरविण्यात येते. शासनाने ठरवुन दिलेल्या निकषाप्रमाणे डीबीटीद्वारे रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येतील.

# दारव्हातील विद्यार्थी शिष्यवृत्तीत जिल्ह्यात प्रथम



**दारव्हा, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: नगरपरिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळविला. अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. या सर्व गुणवंतांचा पालकांसह गौरव करण्यात येईल, असे मुख्याधिकारी विठ्ठल केदारे यांनी सांगितले.

नगरपरिषद मराठी शाळा क्र. २, क्र. ३ व क्र. ४च्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल छोटेखानी कौतुक सोहळा घेण्यात आला. कार्यक्रमाला प्रशासन अधिकारी तथा मुख्याध्यापक रमेश राठोड, ज्येष्ठ शिक्षक रंगारी व पालक शिरीष कापडे उपस्थित होते. या परीक्षेत शाळा क्र. २चा पाचवीचा स्पंदन शिरीष कापडे, आठवीची समृद्धी शशिकांत रोडगे यांनी जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला.

अथर्व सुनील हजारे हा द्वितीय आला. शाळा क्र. २चे तेजस मांडवगडे, धनश्री फुरसुले, कौतिक चव्हाण, जिया वासनिक, वलय कसंबे, जान्हवी अस्वार, ओम राठोड, भक्ती कडू, रचना साखरकर, सुयोग सरताबे, कार्तिक खोडे, हर्षित दुधे, जय पवार, इयत्ता आठवीतील अथर्व हजारे, वैभवी तायडे, उत्कर्षा सरताबे, अथर्व निमकर, भाविका सुकोडे, मानसी मते, समीक्षा तायडे, आदर्श लडबडे, सार्थक तुळजापुरे, ईश्वरी निमकर, ऋषिकेश गुल्हाने, गायत्री राठोड, भार्गवी पांडे, मानस राऊत, चैतन्य तायडे, पुष्कर खाडे, भावना जाधव, अमृता दुधे, अथर्व काळे, अंजली क्षीरसागर, तेजस्वी ठाकरे, शाळा क्र. ३ चे वाल्मीक राठोड, तनव ताजने, अनन्या निमकर, रोहन दुधे, संस्कार निमकर, अवनी गडेचा, शाळा क्र. ४ची सृष्टी काळे हिने गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. कार्यक्रमाचे राकेश मडावी संचालन तर पूर्णेंद्र येळणे यांनी आभार मानले.

# आर्णीतील कुख्यात गुन्हेगार स्थानबद्ध

**आर्णी, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: येथील कुख्यात गुन्हेगाराविरुद्ध एमपीडीए कायद्याअंतर्गत आर्णी पोलिसांनी कारवाई केली. त्याला पुणे येथून अटक करून नाशिक कारागृहात एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे. राहुल पप्पू बिहाडे (वय २७, रा. सेवादासनगर, आर्णी) असे आरोपीचे नाव आहे. आर्णीचे ठाणेदार नीलेश सुरडकर यांनी आरोपीविरुद्ध एमपीडीएचा प्रस्तव तयार करून पोलिस अधीक्षकांमार्फत मंजुरीसाठी जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे सादर केला होता. या प्रस्तावास १७ जुलै रोजी मंजुरी देण्यात आली. मात्र आरोपी हा शहरात नसून पुणे येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून पथकाने पुणे गाठून आरोपीला अटक करीत नाशिक कारागृहात स्थानबद्ध केले. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बी. जे. यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक नीलेश सुरडकर, सहायक पोलिस निरीक्षक मिलिंद पारडकर, मनोज चव्हाण, अरविंद चेंमटे, गुणवंत बोईनवाड, आकाश गावंडे आदींनी केली.

# पांढरकवड्यात डायलिसिस सेंटरचे लोकार्पण

**पांढरकवडा,दि.२१, महासागर प्रतिनिधी**: येथील उपजिल्हा रुग्णालयात नव्याने सुरू करण्यात आलेल्या डायलिसिस सेंटरचे लोकार्पण करण्यात आले. येथे डायलेसिस सेंटर होत असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक सुखदेव राठोड यांनी आपल्या भाषणातून दिली.आठ बेडचा डायलिसिसचा हा विभाग असून त्यात दोन बेड हेपिटायटिस करिता राखीव ठेवण्यात आल्याची माहिती अधीक्षक वैशाली सातुरवार यांनी प्रास्ताविकातून दिली.तसेच रुग्णांनी या मोफत डायलिसिस सेंटरचा लाभ घेण्याचे आवाहन सातुरवार यांनी केले. यावेळी सा. बा.चे कार्यकारी अभियंता शंतनू दुधाडे, गटविकास अधिकारी डॉ. भागवत रेजिवाड, पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे, गीरधर पावडे, जि.प.चे माजी बांधकाम सभापती गजानन बेजंकीवार उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन राजेंद्र वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन तालुका वैद्यकीय अधिकारी मडावी यांनी केले.

# वि.सा.संघाव्दारा आषाढ सरी कवी संमेलन व चित्र प्रदर्शनी संपन्न



**पांढरकवडा, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: शनिवार १९ जुलाई रोजी स्थानिक सुराणा भवन सभागृहात कवी संमेलन व प्रेमराव वखरे यांच्या व्यंगचित्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले.

कविनी सद्यपरिस्थितीवर तसेच विविध विषयावरील बहारदार कविता सादर केल्या. कविसंमेलनात जुन्या नवीन कविनी सहभाग घेतला.

महेश अक्केवार,रुपाली धात्रक, गजानन काकडे , साहित्यिक प्रा.जलतारे, सौ.रीना कापर्तीवार, प्रमोद रामटेके, प्रा.स्वप्नील कुलकर्णी, सौ.अपर्णा देशपांडे, प्रमोद हामंद, प्रा.सौ.अन्नपूर्णा चौधरी, सौ. सीमा बुक्कावार, सुभाष बाजोरिया, सि.ए. प्रकाश चोपडा, माधुरी मुजारिया, राजू मेश्राम, वसंत काळेवार, राजू राठोड, सौ. स्नेहल बेले, श्रीकांत काळे, दीपक कापर्तीवार, सौ. भारती कडू इत्यादींनी कविता सादर केल्या.

यावेळी प्रेमराव वखरे यांनी रेखाटलेल्या व्यंगचित्रं व इतर चित्रांचे प्रदर्शन करण्यात आले.यावेळी मदन जिड्डेवारसह अनेक मान्यवर उपस्थीत होते. प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्रा. राहुल भानेगावकर यांनी व संचलन सौ. भारती कडू यांनी तर आभार प्रदर्शन संजय चन्नावार यांनी केले.

# माळवागद सिमेंट रस्त्याचा निधी गेला कुठे?

**महागाव,दि.२१, महासागर प्रतिनिधी**: तालुक्यातील माळवागद येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोरील सिमेंट रस्त्याच्या कामाचे माजी खासदार भावना गवळी यांच्याहस्ते लोकसभा निवडणुकीपूर्वी भुमीपुजन करण्यात आले होते.मात्र दोन वर्षे उलटून गेली असतांना सुध्दा सिमेंट रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली नाही. या रस्त्याच्या कामासाठी जनसुविधा योजनेअंतर्गत सनं २०२२-२३ या कालावधीमध्ये ७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. परंतु नुकतेच ग्रामपंचायत माळवागद येथील सिमेंट रस्त्याच्या कामात अपहार झाल्याचे चौकशीत उघड झाले आहे. त्यामुळे संबंधित रस्त्याच्या कामाला दोन वर्षे लोटुनही कामाला सुरुवात न झाल्याने या सिमेंट रस्त्याचे काम भुमीपुजन करूनही रखडले.त्याचा निधी परस्पर उचलला गेला याची चौकशी होणे गरजेचे आहे ?

### दारव्हा रोडवरील दुभाजकाची दुरवस्था

**यवतमाळ** : दारव्हा मार्गावर असलेल्या दुभाजकाची मोठी दुरवस्था झाली आहे. याकडे बांधकाम विभागाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे अपघाताची शक्यता बळावली आहे. दारव्हा मार्गावरील लोहारापर्यंत सिमेंट रस्त्याचे काम करण्यात आले. या रस्त्यावर रेलिंगचे दुभाजक तयार करण्यात आले. यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्ची घालण्यात आला. परंतु काही महिन्यात स्टीलचे रेलिंग पाइप तुटून पडले आहेत. शिवाय, या दुभाजकातील झाडेही वाढली आहे. दारव्हा मार्ग अत्यंत वर्दळीचा आहे. दिवसभर वाहने धावतात. त्यामुळे बांधकाम विभागाने या मार्गावरील तुटलेल्या दुभाजकाची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

# पाथ्रड गोळे येथे 'कौशल्य वाहिनी' अंतर्गत डिजिटल प्रशिक्षण

**नेर , दि.२१, महासागर प्रतिनिधी**: ग्रामीण भागातील लोकांना डिजिटल व्यवहारातील ज्ञान आणि सायबर क्षेत्रातील होणारी फसवणूक टाळण्यासाठी तालुक्यातील पाथ्रड गोळे येथे कौशल्य वाहिनी अंतर्गत डिजिटल प्रशिक्षण देण्यात आले.

रेल्वे विकास निगम लिमिटेड आणि दि इंस्टिट्यूशन ऑफ सिव्हिल इंजिनिअर्स सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेला 'कौशल्य वहिनी' कार्यक्रम नेर तालुक्यातील पाथ्रड गोळे येथून सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी गटविकास अधिकारी राजीव शिंदे, शिवसेनेचे तालुका प्रमुख तथा सभापती मनोज नाल्हे, सरपंच नीलिमा रोशन चोपडे, युवा सेना उपाध्यक्ष इंद्रजीत चव्हाण, ग्रामविकास अधिकारी अमोल घावडे, पोलीस पाटील प्रफुल्ल नेरकर, मुख्याध्यापक नितीन मोरे, रोशन चोपडे, प्रीतम




गावंडे, नितीन चहांदे उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी सर्व सुविधायुक्त विशेष वाहन सेवेत असणार आहे. सोबतच दोन प्रशिक्षक गावातील बचत गटांच्या महिला, युवक युवतींना एक महिना प्रशिक्षण देणार आहे. या मोबाइल डिजिटल क्लासरूमद्वारे युवकांना डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण दिले जाणार असून, ग्रामस्थांसाठी विशेष जनजागृती सत्रांचे आयोजन केले जात आहे. या सत्रांमध्ये ग्रामीण जनतेला सायबर फसवणूक, आर्थिक फसवणूक आणि डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाच्या सावधगिरीबाबत सविस्तर माहिती दिली जाते. तज्ज्ञ प्रशिक्षकांद्वारे बनावट कॉल्सपासून सावध राहण्याचे मार्गदर्शन केले जात असून ओटीपी शेअर न करणे, अज्ञात लिंक्सवर क्लिक न करणे, अशा विविध महत्त्वाच्या गोष्टी समजावून सांगितल्या जात आहेत. याशिवाय, युपीआय, डिजिलॉकर, ई-बैंकिंग आणि डिजिटल पेमेंट यांसारख्या उपयोगी डिजिटल साधनांचा सुरक्षित वापर कसा करावा याचे प्रशिक्षणही दिले जात आहे.

## अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी

▪ विविध गावातील महिलांचे पोलिस अधीक्षकांना निवेदन



**बाभूळगाव, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: तालुक्यातील अनेक गावांमध्ये अवैध रित्या देशीदारू, हातभट्टी दारू मोठ्या प्रमाणात विक्री केल्या जात आहे. नांदुरा बु. येथे ४, पालोती येथे ४, प्रतापपूर येथे ३ या प्रमाणे अवैधरीत्या दारू विक्री करणारे दुकानदार त्यांच्या घरीच हातभट्टी व देशी दारू विक्री करीत आहेत. याबाबत या गावातील महिलांनी बाभूळगाव ठाणेदारांना निवेदन दिले होते. परंतु त्यांनी कारवाई न केल्याने महिलांनी मंगळवार दि. १५ जुलै रोजी पोलीस अधीक्षक यांची भेट घेवून निवेदन दिले. याउपरही काही कारवाई न झाल्यास येत्या शुक्रवार दि. १८ जुलै रोजी नांदुरा बु. (पुलाचे) येथे चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला.

या गावातील दारू विक्रेते मुजोर झाले असून ते महिलांशी हुज्जत घालत आहेत. दारूच्या आहारी जावून गावातील तरूण व्यसनाधीन झाले असून घर-संसार उध्वस्त होत आहेत. याबाबत येथील पोलीस प्रशासनाला वारंवार सुचना दिल्या परंतु त्यांनी जाणीवपुर्वक या प्रकाराकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे येथील पोलीस व अवैध दारू विक्रेते यांचे हितसंबंध असावे. असा आरोप महिलांनी निवेदनातून केला आहे. यावेळी लक्ष्मी लाडे, लक्ष्मी देवकर, रेणुका पवार, सुमित्रा शेळके, आशा पवार, नंदा शेळके, बाली पवार, इंद्रकला गुबरे, पार्वता देवकर, शिवानी शेळके, कांता पवार आदींसह महिला उपस्थित होत्या.

## सात महिन्यांपासून निराधारांचे पैसे थकीत; हाताचे ठसे लागेना

**घाटंजी, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: मागील सात महिन्यांपासून ज्येष्ठ नागरिकांचे श्रावणबाळ, संजय गांधी योजनेचे निराधार पेन्शन थकीत आहे. तालुक्यातील अपंग, विधवा यांना मिळणारे निराधारांचे पैसे सुद्धा थकीत आहे. ते तत्काळ देण्यात यावे, यासाठी साथी निराधार संघटनेचे मुख्य संयोजक महेश पवार यांनी तहसील कार्यालयात धडक देत जाब विचारला.

सरकारने डीबीटी अंतर्गत निराधारांना पेन्शन देण्याचे ठरविले. त्यामुळे ज्यांचे खाते अपडेट आहे त्यांना निराधाराचा लाभ मिळत आहे. परंतु ज्यांच्या बँक खात्यात समस्या आहे, अशांना पोस्टाचे नवीन खाते काढण्यास तहसीलमधून सांगण्यात येत आहे. ही वृद्ध मंडळी पायपीट करत पोस्टात जातात. मात्र, तिथे बोटांचे ठसे न लागल्याने - त्यांचे खाते निघण्यास अडचण निर्माण झाली आहे. यामुळेच त्यांचे सात महिन्यापासून निराधार पेन्शन थकीत आहे. ज्या वृद्धांचे बोटांचे ठसे लागत नाही आणि नवीन पोस्टाचे खाते काढण्यास अडचण येत आहे अशा वृद्धांसाठी तहसील कार्यालयामार्फत खास करून एक यादी तयार करावी आणि जुन्याच खात्याला लिंक करावे, अशी मागणी साथी निराधार संघटनेचे महेश पवार यांनी तहसीलदाराकडे केली आहे. ज्येष्ठ नागरिकांना थकत्या वयात मजुरीला जाऊन पोटं भरणे शक्य नाही. पैसे कमवीत नाही म्हणून घरातही मान नाही. वृद्धापणामुळे अनेक आजार जडलेले असतात. रक्तदाब, शुगरच्या गोळ्या घेण्यासाठीही यांच्या जवळ पैसे नसतात. हे म्हातारपण त्यांच्यासाठी शापच बनले आहे. अशा परिस्थितीत त्यांना आधार असतो तो फक्त निराधार पेन्शनचा. मात्र हेच पैसे गेल्या सात महिन्यांपासून थकले आहे.

## आरोग्य विभागाचे गृहभेटी देऊन शास्त्रीय कंटेनर सर्वेक्षण

**यवतमाळ , दि.२१, महासागर प्रतिनिधी**: पावसाळ्यात वाढणारा साथरोगांचा धोका नियंत्रणात आणण्यासाठी चालबर्डीमध्ये आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी गृहभेटी देऊन शास्त्रीय कंटेनर सर्वेक्षण केले. यावेळी दूषित कंटेनर रिकामे करण्यात आले. गावात टेमिफॉस ॲक्टिव्हिटी राबविण्यात आली. कोरडा दिवस पाळण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. यवतमाळचे जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. तन्वीर शेख यांनी यासाठी पुढाकार घेतला. हिवताप विभागाच्या माध्यमातून गावपातळीवर साथरोग नियंत्रण



मोहीम राबविली जात आहे. पांढरकवडा तालुक्यातील आरोग्य अधिकारी डॉ. संजय मडावी, प्राथमिक आरोग्य केंद्र पहापळचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विपुल नेमनवार, डॉ. श्रेया तिवारी, पी. जे. स्थूल, सी. एम. लाब्दे यांनी या मोहिमेसाठी मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येणाऱ्या पहापळ उपकेंद्रांमधील चालबर्डी गावात ही मोहिम राबविण्यात आली.

याठिकाणी कीटकशास्त्रीय कंटेनर सर्वेक्षण करण्यात आले, दूषित कंटेनर रिकामे करण्यात आले. गावामध्ये टेमिफॉस ॲक्टिव्हिटी राबविण्यात आली. गावातील सर्व शौचालयांच्या व्हेंट पाइपला जाळीचे कापड बांधण्यात आले. गावातील शेणखत खड्डे गावाच्या बाहेर दूर तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामपंचायत कार्यालयात भेट देण्यात आली. यावेळी ब्लिचिंग पावडरच्या साठ्याची पाहणी करण्यात आली. गावामध्ये कीटकजन्य, जलजन्य, साथरोग उद्भवणार नाहीत, याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

या मोहिमेत सीएचओ डॉ. तुषार आडे, आरोग्य निरीक्षक सी. एम. लाब्दे, एमपीडब्लू पी. पी. बद्दमवार, एएनएम सारिका किरमे, आशा येडमे, आशा अनिता कपडे, स्वाती गिरी, तारा करलुके यांच्यासह अन्य कर्मचारी सहभागी झाले होते.

## श्री शिवाजी विद्यालयामध्ये शालेय निवडणूक उत्साहात

**पुसद, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शालेय मंत्रिमंडळ तयार करण्यासाठी निवडणूक प्रक्रिया उत्साहात पार पडली. निवडणूक प्रक्रियेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. गणेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष श्रीराम पद्मावार, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. उमेश रेवनवार, प्राचार्य रामचंद्र हिरवे आदी मान्यवर उपस्थित होते.

जीवनात आपले राज्य आणि केंद्रीय मंत्रिमंडळ कसे निवडले जाते याचे प्रात्यक्षिक या शालेय निवडणुकीतून विद्यार्थ्यांना मिळणार असल्याचे प्राचार्य पाटील यांनी यावेळी सांगितले. श्रीराम पद्मावार व डॉ. उमेश रेवणवार यांनी मुलींमध्ये उद्भवणाऱ्या कॅन्सर आजारापासून सुरक्षितता कशी मिळवावी या संदर्भात माहिती दिली. सोबतच वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्टडी ॲप रोटरी क्लब मोफत उपलब्ध करून देत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

विद्याथ्यर्थ्यांना निवडणुकीविषयी माहिती व कुतूहल निर्माण व्हावी या उद्देशाने संपूर्ण विद्यालयात निवडणुकीचे एकूण १४ बूथ तयार करण्यात आले. प्रत्येक बुथवर विद्याथ्यर्थ्यांनी आपला गुप्त मतदानाचा हक्क बजावला व शालेय मंत्रिमंडळासाठी इच्छुक असलेल्या ५६ उमेदवारांचे भाग्य मतपेटीत बंद करण्यात आले. यावेळी मतदान प्रक्रियेला एनसीसीचे विजय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसीच्या विद्यार्थ्यांचा बंदोबस्त होता. राष्ट्रीय सेवा योजनेने प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा यासाठी प्रयत्न केले.

ही निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पर्यवेक्षक प्रज्ञा गडदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी पुढाकार घेतला. निवडणूक प्रक्रियेचे व कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन प्रा. गजानन जाधव यांनी केले. याप्रसंगी सर्व विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## वणीमध्ये २४ हजार लाभार्थ्यांनी ई-केवायसी केली नाही

**वणी, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: राज्य शासनाने शिधापत्रिका धारकांसाठी ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक केली असतानाही वणी तालुक्यातील सुमारे २० टक्के लाभार्थ्यांची नोंद अद्याप अपूर्ण आहे. ई-केवायसीसाठी दिलेली अंतिम मुदत ३१ जुलै करण्यात आली आहे. तालुक्यात एक लाख २१ हजार २६८ लाभार्थ्यांपैकी ९७ हजार २७७शिधापत्रिकाधारकांनीच ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. उर्वरित २३ हजार २७७ लाभार्थ्यांची प्रक्रिया प्रलंबित आहे. यासाठी शासनस्तरावर निश्चित करण्यात आलेल्या अंतिम मुदतीपूर्वी अर्थात, ३१ जुलैपूर्वी ज्या सदस्यांची ई-केवायसी झालेली नाही, अशा सर्व सदस्यांची नावे शिधापत्रिकेतून कमी करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर सप्टेंबरपासून अशा व्यक्तीला रास्त भाव दुकानातून धान्य, इत्यादी मिळणार नाही. सर्व रास्त भाव दुकानदारांकडे ई-केवायसी न झालेल्या



व्यक्तींची यादी उपलब्ध आहे. ती सर्व लाभार्थ्यांनी तपासून घ्यावी व आपली ई केवायसी झालेली नसल्यास मुदतीच्या आत करून घ्यावी. तांत्रिक कारणांमुळे कोणीही वंचित राहू नये, यासाठी सरकारने पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे आहे. दुसरीकडे शासनाच्या नियमानुसार ई-केवायसी गरजेचे असले तरी लाभार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविण्यासाठी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. अन्यथा, लाखो गरजवंत रेशनविना राहण्याची वेळ येऊ शकते आणि त्याचे सामाजिक परिणाम गंभीर ठरू शकतात. आधार लिंक न होणे, वृद्धांच्या बोटाचे ठसे न ओळखणे, ग्रामीण भागातील माहितीचा अभाव, ई-सेवा केंद्रांची अपुरी संख्या, इंटरनेट कनेक्टिव्हिटीची समस्या, स्थानिक यंत्रणांकडून अपुरी जनजागृती आदी ई-केवायसी न होण्याची कारणे आहेत.

ई-केवायसी प्रक्रियेमध्ये आधारकार्ड लिंक न होणे, अंगठा न ओळखणे, मशिनने फिंगरप्रिंट न वाचणे, अशी तांत्रिक कारणे अडथळा ठरत आहेत. ग्रामीण भागात साक्षरतेचा अभाव, तांत्रिक अपुरेपणा आणि मार्गदर्शनाचा अभाव ही मोठी कारणे आहेत. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार काही लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकात चूक आहे. अनेक वृद्धांची बोटांची ओळख होत नाही. अशा प्रकरणांची विल्हेवाट लावणे कठीण आहे. वणी तालुक्यातील लाभार्थ्यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, त्यांनी ३१ जुलैच्या आत रास्त भाव धान्य दुकानात आपले आधार कार्ड सोबत घेऊन जावे व आपली ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी असे आवाहन निरीक्षण अधिकारी विवेक पांडे यांनी केले आहे.

## शाळा प्रवेश डिजिटल जाहिरात स्पर्धेचा निकाल जाहीर



**दारव्हा , दि.२१, महासागर प्रतिनिधी**: पंचायत समिती शिक्षण विभागाने जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढावी, या हेतूने डिजिटल जाहिरात स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत प्राथमिक गटात बॅनर मेकिंगमध्ये प्रथम कोलवाई, द्वितीय टाकळी बु, तर व्हिडीओ मेकिंगध्ये प्राथमिक गटात प्रथम खेड व द्वितीय क्रमांक तळेगाव येथील जिल्हा परिषद शाळेने पटकावला आहे. उच्च प्राथमिक गटात बॅनर मेकिंगमध्ये प्रथम वसंत विमुक्त जाती आश्रम शाळा हरू व द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा महातोली, उच्च प्राथमिक गट व्हिडीओ मेकिंगमध्ये प्रथम तरोडा व द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा घाटकिन्ही तांडा यांनी प्राप्त केला. सर्व विजेत्यांना पंचायत समिती शिक्षण विभागातर्फे बक्षीस व सन्मानपत्र मिळणार आहे. स्पर्धेचे मूल्यमापन राम मते, रमेश राठोड, राजेश इंगळे यांनी केले. स्पर्धेचे आयोजन गटशिक्षणाधिकारी क्रांती खेडकर, विस्तार अधिकारी संजय गोगटे, विलास भड यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. यशस्वीतेसाठी लाखखिंडचे केंद्रप्रमुख गणेश राऊत, बीआरसी साधनव्यक्ती प्रवीण सोनोने यांनी परिश्रम घेतले.

### महिलेला मारहाण

**दिग्रस** : तालुक्यातील कांदळी येथे पैशाच्या वादातून दोघांनी महिलेला दगडाने मारहाण केली. ही घटना शनिवारी घडली. उसने घेतलेल्या १ लाखापैकी ५० हजार आता देतो, उर्वरित ५० हजार नंतर देतो, असे राधा यांनी आरोपींना सांगितले.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा

**यवतमाळ, दि.२१, महासागर प्रतिनिधी**: पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होता येणार आहे. स्पर्धेचा अर्ज अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून २० जुलै ते २० ऑगस्टपर्यंत अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.

ही स्पर्धा निःशुल्क आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके,



धार्मिक स्थळे यांविषयी जनजागरूकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषणरहित वातावरण, गणेशभक्तांसाठी केलेल्या सोयीसुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे परीक्षण केले जाणार आहे.२७ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात जिल्हास्तरीय समिती स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देऊन परीक्षण करणार आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा लागणार आहे. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे.

## » संक्षिप्त...

### आचार्य कारंजेकर यांचा सत्कार



**दारव्हा** : श्री दत्त क्षेत्र जांभोरा येथे अखिल भारतीय महानुभव परिषदेचे अध्यक्ष कुलाचार्य प. पू. म. प. मोहनबाबा कारंजेकर आणि राज्य अध्यक्ष प्रकाश नन्नावरे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशनचे उपाध्यक्ष, माजी आ. बाळासाहेब सानप, हाऊसिंग फायनान्स कार्पोरेशनचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला दत्त परिवारतील प.पू. लाड बाबा, मोहन पावडे, मनीष पाटील, राहुल ठाकरे, नेर तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष विवेक घुईखेडकर, बोरी बाजार समितीचे सभापती विराज घुईखेडकर, मिलिंद रामटेके, आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी सदस्यांनी

### कुर्ली येथे सायकलींचे वाटप



**घाटंजी** : तालुक्यातील कुर्ली येथील बाबासाहेब देशमुख विद्यालयात मानव विकास मिशन अंतर्गत मिळालेल्या सायकलींचे वाटप विद्यार्थिनींना करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी आमदार तथा पारवा शिक्षण संस्थेचे सचिव अण्णासाहेब देशमुख पारवेकर होते. प्रमुख पाहुणे निरीक्षण समितीचे अध्यक्ष अनिस खान, सुनील ठाकरे, मोरेश्वर सरोदे, मुख्याध्यापक राजू दिकुंडवार होते. राजापेठ, नारायण पेठ आणि कुर्ली परिसरातील ३० विद्यार्थिनींना सायकलींचे यावेळी वाटप करण्यात आले. संचालन लीलाधर जवादे यांनी तर आभार मनीष अंदुरकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी अजय पोलकमवर, हनुमंतु बोदुलवार यांचे सहकार्य लाभले.

### पूर्वा वानखडेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**घाटंजी** : तालुक्यातील शिवणी केंद्रातर्गत जि. प. राजूरवाडी शाळेचे विद्यार्थिनी पूर्वा अनंता वानखडे ही महाराष्ट्र परीक्षा परिषद, पुणे द्वारा आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) फेब्रुवारी २०२५ परीक्षेत ७० टक्के गुण घेत ग्रामीण सर्वसाधारण गुणवत्ता यादीत स्थान पटकावित तालुक्यात द्वितीय आली आहे. तिने जवाहर नवोदय विद्यालय परीक्षा, अखिल भारतीय सैनिक शाळा परीक्षा, महादीप या परीक्षेतही घवघवीत यश संपादित केले आहे.

### शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय शेतीविषयक प्रात्यक्षिक मार्गदर्शन



**यवतमाळ** : महाराष्ट्र ग्रामीण विकास बँक, यवतमाळ शाखेच्या वतीने शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय शेतीविषयी प्रात्यक्षिक व मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये मारोतराव वादाफळे कृषी महाविद्यालय, यवतमाळ येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत सातव्या सत्रातील कृषी विद्यार्थी चैतन्य शेंडे, साहील विंचूरकर, सृजल धोके, वैष्णवी टोगे, पल्लवी जीवतोडे आणि सयोनी निघोट यांनी सहभाग घेतला. शंकर मेटकर, काशीनाथ राठोड, रमेश राठोड, रामराव राठोड, रामेश्वर राठोड, मारोती गेजीक यांच्यासह अनेक शेतकऱ्यांची उपस्थिती होती. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. ए. ठाकरे, उपप्राचार्य प्रा. एम. व्ही. कडू, कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. पी. लोखंडे, तसेच प्रा. सी आर ठोंबरे आणि प्रा. ए. एम. अंभोरे यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमास महाराष्ट्र ग्रामीण विकास बैंक, यवतमाळचे शाखा व्यवस्थापक सूरज थावरे यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांनी शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

### अ.भा.वि.प.ची नगर कार्यकारीणी घोषीत

**यवतमाळ** : अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची सन २०२५-२६ करिता नगर कार्यकारिणी जिल्हाप्रमुख प्रा. पंकज किनेकर यांनी जाहीर केली. नगर अध्यक्ष म्हणून प्रा. अभिषेक खंडारे व नगरमंत्री कुणाल काळे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी उर्वरित कार्यकारिणीची घोषणा केली. कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष प्रा. कैलास बोके, प्रा. यशवंत डांगे, सहमंत्री जय मांडवे, विठ्ठल कोल्हे, ऋतुजा नागरगोजे, कार्यालयमंत्री श्रीकांत चौधरी, कार्यालय व्यवस्था प्रमुख चेतन राऊत, सोशल मीडिया प्रमुख जयदीप कचुधनी, खेलो भारत प्रमुख श्रद्धा खडसे, जनजाती प्रमुख समीक्षा प्रधान, कलामंच प्रमुख मोहिनी देवकते, सहप्रमुख नैना शेंडे, एसएफएस प्रमुख पवन आडे, सहप्रमुख कार्तिक जाधव, रितेश डुकरे, अनुजा तिवारी, एसएफडी प्रमुख गायत्री नक्षणे, टीएसव्हीके प्रमुख जय खंडार, सहप्रमुख तन्वी कोंडेकर, फार्म व्हिजन प्रमुख हर्षदा इंगोलकर, हर्ष गिरी, मेडिव्हिजन प्रमुख अजय धाकणे, अग्रव्हिजन प्रमुख गार्गी झाडे यांचा समावेश असल्याचे जिल्हा संयोजक आदर्श राऊत यांनी कळविले.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक : -२०१०/३५७९९-

महासागर यवतमाळ

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्णा तन्मुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, बस स्टँड चौक, होटल प्रकाश जवळ, यवतमाळ येथे प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनमुखदास चांडक मुख्य कार्यालय पोन-०७१२-२७६७६२८-९९२२९७००२३ स्थानिक संपादक-रघुवीरसिंह चौहान फोन-९४२३४३३२४४ (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहिल.)

